ISSN 2231-573X
UGC Care Listed Journal

नदी विशेषांक

# तिफण

दिवाळी - २०२३

वर्ष : १४ वे । अंक : तिसरा / चौथा
ऑक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबर २०२३




# अनुक्रमणिका

• नदी विशेषांक •

संपादकीय ... ०९
१. नदी समजून घेताना ... ११
२. माझी सिंदफणा नदी : एक भळभळती जखम ... १४
३. नदी आणि संस्कृती ... १८
४. 'नदी संदर्भ' समाज संस्कृतीचे उत्थान ... २१
५. नद्या : भारतीय संस्कृतीच्या पाउलखुणा... २६
६. नदी – लोकमाता ... ३५
७. जीवनदायिनी नदी ... ४३
८. नदीकाठ आणि मी ... ४७
९. मी नर्मदापूत्र ... ५६
१०. नदी देवता व शिल्प ... ६४
११. नदी, ताई आणि मी ... ७०
१२. वारसा नदीचा ... ७५
१३. कमलदलाचे जलबिंदू ... ८०
१४. स्वप्न सत्यात उतरवायचंच ... ८४
१५. जगुबा धनगर ... ८८
१६. मानवी जीवन व वाङ्मयातील नदीचे स्थान ... ९१
१७. वर्धा नदीच्या परिप्रेक्ष्यातील मानवी जीवन ... ९६
१८. गाहासत्तसई (गाथासप्तशती) या ग्रंथातील नद्या आणि त्यांचे संदर्भ ... १०१
१९. मानवी जीवनाच्या पुनर्रचनेत नद्यांचे योगदान : एक दृष्टीक्षेप ... १०९
२०. संत तुकारामांची नदी विषयक सुभाषिते... ११४
२१. कवीच्या दृष्टीक्षेपातील नदी ... ११९
२२. आजोळची जीवनदायिनी : चिखली ... १२३
२३. माणदेशाची वरदायीनी माणगंगा नदी .... १२८
२४. सीना नदी : शुष्क प्रदेशातील जीवनदायिनी ... १३५
२५. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील जीवनवाहिनी कर्ली नदीची स्थिती ... १४०
२६. भारतीय संस्कृती आणि 'यमुना' ... १४६
२७. नमामि चंद्रभागा ! ... १५२
२८. नाईल नदी व इजिप्त...नेत्रसुखद अनुभुती... १५६
२९. गोदावरी नदी : जैविक शुद्धीकरण ... १५९
३०. पाणी, केप टाऊन आणि आपण ... १६२
३१. धुरी : आपत्ती निवारण ... १७१
३२. सोन्याचा धूर, कारखान्यातून नव्हे; तर जलविकासातून ... १७५
३३. जल सुरक्षा : भारतातील समस्या आणि आव्हाने ... १८०
३४. नदी प्रदूषण : एक घातक समस्या ... १९१
३५. सरस्वती नदीचे श्रीगोंदा तालुक्यातील योगदान ... १९७
३६. नदी, पर्जन्यमान आणि दुष्काळ : यातील परस्पर संबंध ... २०३
३७. मुसी नदी: जीवनाच्या स्त्रोतापासून ड्रेनेजपर्यंत ... २०८
३८. 'मानवलोक' स्वयंसेवी संस्थेची नदी संवाद यात्रा - एक अनुभव ... २१५
३९. दुष्काळमुक्त महाराष्ट्रासाठी 'जल आराखडा' ... २२५
४०. नदीच्या स्त्रीत्वाचा वेध घेत महाराष्ट्रातील नद्यांचे धार्मिक महत्त्व उद्धृत करणारे 'नदी आणि स्त्रीत्व' ... २३१
४१. गोदेच्या किनाऱ्यावरचं समृद्ध, प्रवाही, प्रांजळ जग : 'नदीष्ट' ... २३८

TENDRA ALUNKE 23



-डॉ. शिवाजी हुसे, *छत्रपती संभाजीनगर*


*साहित्यिक, संपादक व नदी अभ्यासक*

❛ सुखना बचाओ जन आंदोलन संघर्ष समितीच्या वतीने मौजे आवा अंतरवाला, वदापूर येथील सुखना काठी शेतकर्यांची जमीन वाहुन गेली त्यासंदर्भात त्यांना मदत मिळावी यासाठी आवाज उठवला. सुखना नदी रसायन युक्त मन्याचे पाणी पावसाळ्यात सोडले जात होते त्याविरुद्ध माध्यमातून आवाज उठवला. सुखना नदीतील घारेगाव येथून वाळू उपसा अवैध सुरू होता त्याविरुद्ध आवाज उठवला. निवेदने दिली. त्याचप्रमाणे समितीच्या वतीने शिवार फेरी आयोजित करून सुखना नदी उगम स्थान सारोळा कोलठाण शिवारात जाऊन पाहणी केली. जननागृती घडऊन आणली.

# लढा सुखना नदीच्या अस्तित्वाचा

सुखना नदी ही औरंगाबाद जवळील पूर्व सिमेवरून सारोळा कोलठाण शिवारातून ऊगम पावणारी एक जिल्ह्यातील महत्वाची नदी आहे. पूर्वी ही नदी बारमाही वहायची. पर्यंत सुखना नदी भरभरून वहायची. याचा अनुभव मी ही स्वतः घेतलेला आहे. नंतर सतत पडणारा दुस्काळ, अवर्षण यामुळे पर्जन्यमान कमी कमी होत गेले. त्याशिवाय डोंगरात व नदीकाठी झालेली भरमसाठ वृक्ष व जंगलतोड यामुळे सुखना नदी ही बारमाही न वाहता हंगामी झाली आहे. सुखना नदी कोलठाण, हर्सुल, सावंगी, पळशी, नारेगाव येथून वाहत चिकलठाणा औद्योगिक वसाहतीतून वाहत जाते. या नदी पात्रात मन्याचे प्रदुषित जल ओहोळ, शहरातील

सांडपाणी व ड्रेनेज चे पाणी सोडले जात असल्यामुळे या नदीला गटार गंगेचे स्वरूप प्राप्त होऊन सुखना नदी प्रचंड प्रदुषित झाली आहे. पुढे निपाणी गावा पर्यंत ही नदी खूप प्रदुषित आहे. त्या शिवाय नदी पात्रातील वाळूचा भरमसाठ ऊपसा केल्यामुळे नदीचे गतवैभव हरवले आहे. नदीत कुठे विट भट्या सुरु आहे. काही ठिकाणी लोकांनी भराव टाकून घरे बांधली त्यामुळे सुखना अतिक्रमणाच्या विळख्यात सापडून पात्र अरुंद झाले आहे. मोठ मोठ्या वेड्या बाभळीची झाडे नदी पात्रात ऊगली आहे. मात्र सुखनाच्या या अवस्थेकडे कुणीही लक्ष देत नाही. ज्या सुखना नदी काठी बालपण गेले, खेळलो, बागडलो, जिच्या पाण्यावर हा देह पोसला त्यामुळे सुखनाचे फार मोठे रुण आहे. मी जेव्हा जेव्हा सुखना काठी जातो, गावाकडे जातो तेव्हा मन प्रचंड अस्वस्थ होते. सुखनाचे आजचे रूप पहावत नाही. या मनातील अस्वस्थतेतूनच काही वर्षापूर्वी मी दै. लोकमत मधून सुकत चाललेले सुखना काठचे जीवन व गड्या माझा गाव बरा या सदरातून दै. लोकमत मध्ये सुखना विषयी लिहिले होते. त्याचे चांगले स्वागतही झाले होते. या नदीला वाचवण्यासाठी काहीतरी केले पाहिजे या जाणिवेतून सुखना नदी बचाओ संदर्भात मी फेसबुकला पोष्ट टाकली. त्यामुळे शिक्षक, पत्रकार, प्राध्यापक, पर्यावरण प्रेमी, प्राध्यापक आणि सामाजिक कार्यकर्ते या समविचारी मित्रांना सोबत घेऊन सुखना बचाओ जन आंदोलन संघर्ष समितीची स्थापना महाड चवदार तळ्याचा सत्याग्रह दिन आणि जागतिक जल दिनाच्या पार्श्वभूमिवर करण्यात आली. उद्देश, व पुढील दिशा ठरविण्यासाठी ऑनलाईन बैठक लॉक डाऊन असल्यामुळे घ्यावी लागली. नंतर काही ऑनलाईन याख्याने घेतली. मी स्वतः सुखना नदी : अस्तित्व व भवितव्य या विषयावर फेसबुक लाईव्ह व्याख्यान दिले. ग्रामविकास संस्थेचे सचिव नरहरी शिवपुरे यांचे चित्ते नदी पुनरुज्जीवन एक



अनुभव या विषयावर छान व्याख्यान झाले. तर पक्षीमित्र दिलीप यार्दी यांचे सुखना काठचे पक्षी वैभव या विषयावर अभ्यासपूर्ण व्याख्यान संपन्न झाले. सातत्याने सोशल मिडियावर सुखना नदी संदर्भात जनजागृती सुरु ठेवली. त्यामुळे हा विषय ऐरणीवर आला. जन माणसात चर्चा झाली. मी सुखना नदीची विदारकता दर्शवणारी दीर्घ कविता लिहिली. सुखना मायची कहाणी या नावाने संग्रह प्रसिद्ध केला. त्याचे प्रकाशन सुखना नदीकाठी देशगव्हाण येथे केले. महंत बा. भो. शास्त्री, प्राचार्य डॉ. विजय भोसले, डॉ. सर्जेराव जिगे, अशोकराव काळे, भाऊसाहेब घुगे, डॉ. बाळासाहेब बेळगे, शिवाजीराव दांगे, सुरेश जु... पाटील, चंदू नवपुते, सरपंच अनंत हुसे, शिवाजीराव कराड, महादेव हुसे, जगनाथ हुसे भाऊसाहेब कळमकर, प्रा. संदीप हुसे, प्रा. एकनाथ डोळे, संतोष कळमकर, प्रमोद हुसे, नारायण अवघड, बाबा साहेब पठाडे, मयुरराज हुसे, महादेव बोंडारे आदींच्या उपस्थितीत प्रकाशन झाले. यावेळी सुखना बचाओ जन आंदोलन संघर्ष समितीच्या वतीने महंत बा. भो. शास्त्री, प्राचार्य डॉ. विजय भोसले, डॉ. सर्जेराव जिगे यांना सुखना भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तसेच ग्रा.प. सदस्य व सरपंच यांचा सत्कार समितीच्या वतीने करण्यात आला. दै अँग्रोवनमध्ये मशागत या सदरात नदी वाचविण्याचा नवा आदर्श या शिर्षकाचा लेख



साहित्यिक डॉ. भाऊसाहेब मिस्तरी यांनी लिहिला. सुखना बचाओ जन आंदोलन संघर्ष समितीच्या वतीने जे आवा अंतरवाला, बदापूर येथील सुखना काठी शेतकर्यांची जमीन वाहुन गेली त्यासंदर्भात त्यांना मदत मिळावी यासाठी आवाज उठवला. सुखना नदी रसायन युक्त मन्याचे पाणी पावसाळ्यात सोडले जात होते त्याविरुद्ध माध्यमातून आवाज उठवला. सुखना नदीतील घारेगाव येथून वाळू उपसा अवैध सुरू होता त्याविरुद्ध आवाज उठवला. निवेदने दिली. त्याचप्रमाणे समितीच्या वतीने शिवार फेरी आयोजित करून सुखना नदी उगम स्थान सारोळा कोलठाण शिवारात जाऊन पाहणी केली. जननागृती घडऊन आणली. त्या परिसरातील नागरिकांशी संवाद साधला. तसेच पळशी, कोलठाण येथे शिवार फेरी आयोजित करून बैठक घेऊन हा विषय लोकांना समजून सांगितला. सततचा पाऊस व कोरोना यामुळे फारसं काम करता येत नव्हतं तरी जमेल तसं काम करीत गेलो. शासन पातळीवर निवेदने दिली त्यात मा. जिल्हाधिकारी औरंगाबाद, मा. प्रशासक मनपा औरंगाबाद, प्रदुषण महामंडळ, औरंगाबाद, मा. आ. नारायणराव कुवे, मा. ना. भागवतराव कराड, मा. आ. अंबादास दानवे, यांना हा विषय समजून सांगितला निवेदने दिली. भाऊसाहेब घुगे यांनी मंत्रालयात जाऊन मा. पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांना निवेदन दिले. त्यांनी प्रस्ताव सादर करण्याचे आदेश दिले. माध्यमातून सातत्याने सुखना विषयी जनजागृती केली. सुखना धरणावर गारखेडा येथे मा. पक्षिमित्र दिलीप यादी यांच्या मार्गदर्शनाखाली पक्षी निरिक्षण आयोजित केले. उद्देश हाच की लोक नदीशी पर्यावरणाशी जोडले जावेत. तसेच निपाणी या गावी जाऊन सुखना नदी पात्राची पाहणी करून लोकांशी संवाद साधला. चिकलठाणा परिसरात नदीपात्रा ची पाहणी करून नागरिकांशी चर्चा केली. वाकुळणी भायगाव येथे सुखना नदीकाठी पुरामुळे शेतकऱ्यांची जमीन वाहून गेली त्याची पाहणी करून आवाज उठवला. सातत्याने गावा शिवारांत सुखना नदी काठी जाऊन जन प्रबोधन केले. मा. अंबादास दानवे यांनी मा. पर्यावरण मंत्र्यांना पत्र पाठऊन या आंदोलनास बळ दिले. केंद्र शासनाच्या नमामी गंगे यांजनेतून मनपाच्या प्रयत्नाने निधी जाहीर झाल्याचे समजले. हे काम लवकर सुरु करावे यासाठी निवेदन दिले. अनेक सरपंच, ग्रा.पं. सदस्य, यांना भेटून हा विषय समजून सांगितला. मागच्या आठवड्यात सामितीच्या पदाधिकाऱ्यांची ऑनलाईन बैठक घेऊन पुढील आंदोलनाची दिशा व मागील कार्याचा आढावा घेतला. त्याची माध्यमांनी चांगली दखल घेतली. महाराष्ट्र टाईम्स मध्ये पत्रकार बोडखे यांनी खूप छान प्रकाश टाकला. दखनी स्वराज्य मधून संपादक संतोष तांबे यांनी सुखना बचाओ जन आंदोलनाच्या उपक्रमाची चांगली दखल घेऊन हा विषय जन सामान्यापर्यंत पोहचविला. त्याचबरोबर दै. लोकमत, सकाळ, देशोन्नती, गावकरी, पुढारी, तिफण डिजिटल यांनीही विशेष दखल घेतली. नदी प्रेमी सामाजिक कार्यकर्ते रामचंद्र नागलोद यांनीही सोशल मिडियावर सुखना नदी विषयक लेखन करून कविता लिहिली. या आंदोलनास जलतरण संघटना औरंगाबाद, परिवर्तनवादी कवयित्री विचारवंत डॉ. प्रतिभा अहिरे, कवी देवानंद पवार, डॉ. अंबादास सगट आदींनी



पाठिंबा दिला. आम्ही सोबत आहोत हा विश्वास दिला. सुखनावर शॉर्ट फिल्म तयार करायची आहे. कवयित्री माधवी देवळाणकर यांनी सुखना मायची कहाणी चे अभिवाचन केले आहे. सुखना बचाओ जन आंदोलन संघर्ष समितीच्या वतीने जलतज्ञ डॉ. शंकरराव नागरे यांना पीएचडी. मिळाल्याबद्यल त्यांचा सत्कार केला. त्यांच्याशी सुखनाविषयी चर्चा केली. सुखना बचाओ जन आंदोलनाचा हा लढा सुरुच आहे. यासाठी समितीचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. शिवाजी हुसे, अशोकराव काळे हे पर्यावरण प्रेमी आहे. युवा उद्योजक आहेत. उपाध्यक्ष भाऊसाहेब घुगे हे युवासेना जालना जिल्हा प्रमुख, कृषी उत्पन्न बाजार समिती जालनाचे संचालक, सचिव डॉ. बाळासाहेब बेळगे हे माजी सरपंच, सामाजिक कार्यकर्ते व युवा उद्योजक आहेत. कार्याध्यक्ष शिवाजीराव दांडगे हे नगरसेवक व सामाजिक कार्यकर्ते आहेत. सह सचिव सुरेश जुए पाटील हे युवा उद्योजक आहेत. प्रा. संदीप हुसे व प्रा. एकनाथ डोळे हे शिक्षक व-सामाजिक कार्यकर्ते आहेत. मयूरराज हुसे, अजिंक्य ढाकणे हे युवा कार्यकर्ते आहेत. प्रसिद्धी प्रमुख विशाल हुसे हे पत्रकार आहेत. चंदू नवपुते हे उद्योजक व कार्यकर्ते आहेत. बाबासाहेब पठाडे हे उच्च शिक्षित असून शिक्षक आहेत. नारायण अवघड हे शेतकरी व सामाजिक कार्यकर्ते आहेत. अनिल वावरे हे पोलिस पाटील आहेत. सोपान कोळकर हे युवा उद्योजक व छावाचे लढाऊ कार्यकर्ते आहेत. आनंद पारख हे पत्रकार व उद्योजक आहेत. बळिराम काळे हे आदर्श व प्रयोगशिल शेतकरी आहे. महादेव बोंडारे हे कंपनीत नोकरी करतात. हे सर्व पदाधिकारी सामाजिक बांधिलकीतून या जन आंदोलनात तनमन धनाने आपले योगदान देत आहेत. प्रतक्षा प्रत्यक्ष अनेकांचे पाठबळ समितीला मिळत आहे. सुखना नदीचे प्रदुषण थांबऊन या नदीला गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. सुखना मायचे आमच्यावर प्रचंड रुण असून तिचा श्वास मोकळा करून तिचे अस्तित्व शाबूत रहावे. यासाठी आमचा प्रयत्न आहे. जागतिक नदी दिना निमित्त ऑगस्ट - सप्टेंबर मध्ये सुखना नदी महोत्सव घेण्याचा समितीचा मानस आहे. तसेच मराठवाडा पाणी परिषद, चर्चासत्रे, मेळावे, सभा, बैठका, कार्यशाळा घेण्याचाही आमचा प्रयत्न आहे नदी प्रेमी नागरिक, कार्यकर्ते, घडविणे, पर्यावरणाकडे

गांभिर्य पूर्वक पाहणारा पिढी तयार करणे आणि सुखना नदीचे पुनरुज्जीवन करणे हा आमचा ध्यास आहे. सुखना -दुधना - लहुकीच्या संगमावर 'चला नदीशी नातं जोडूया' या उपक्रमांतर्गत नुकतेच कविसंमेलन घेण्यात आले. जिल्हाधिकारी कार्यालयात 'सुखना'विषयी बैठक आली. काम सुरु आहे. सुखना नदीच्या अस्तित्वाचा हा लढा कायम सुरु राहील. सुखना मायच्या लेकरांनी हा लढा ऊभा केला आहे. आगामी काळात या लढ्याला अधिक गती मिळेल यात काही संदेह नाही. त्यासाठी आपणा सर्वांचे सहकार्य, मार्गदर्शन व पाठबळ आवश्यक आहे.

•••


**- डॉ. शिवाजी हुसे,**

कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर,

मराठी विभागप्रमुख,

शिवाजी महाविद्यालय, कन्नड.

मो. ९४०४०००३९८

Email : huseshivaji@yahoo.com